# यावल महाविद्यालयात राष्ट्रीय ग्रंथपाल दिवस साजरा करण्यात आला

यावल (वार्ताहर) जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय , यावल येथे प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि. 12 ऑगस्ट 2022 रोजी ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या 130 व्या जयंती निमित्त 'राष्ट्रीय ग्रंथपाल दिवस' साजरा करण्यात आला. त्यानिमित्त महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एम.डी. खैरनार, प्रा. ए. पी. पाटील व प्रा संजय पाटील यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. उपप्राचार्य प्रा.एम. डी. खैरनार यांनी ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या व्यक्तित्वावर व त्यांच्या कार्याबद्दल सखोल असे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे आयोजन संतोष ठाकूर यांनी केला.सदर प्रसंगी डॉ. एस. पी. कापडे, डॉ. आर. डी. पवार, डॉ पी. व्ही. पावरा, मुकेश येवले, मिलिंद बोरघडे, अनिल पाटील,प्रमोद भोईटे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी ,विद्यार्थिनी उपस्थित होते.